ePaper

**शिवरायांचे स्मारक राजभवनावर होऊ द्या, उद्धव ठाकरे यांचा उदयनराजे यांच्या मागणीला पाठींबा**

| वर्ष - 8 | अंक - 260 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

## आतील पानांत


- सुपर ओव्हर थरारात दिल्लीची सरशी
- एका पत्रामुळे राक्षेवरील निलंबन कायम!
- तुम्ही भूतकाळ बदलू शकत नाही
- विद्यार्थ्यांने ट्रम्पला खेचले न्यायालयात


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 17एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### सोनिया, राहुल आणि बड्या नेत्यांची नावे आरोपपत्रात, भक्कम पुरावे !

# ‘नॅशनल हेरॉल्ड’ प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा घपला!

## गांधी कुटुंबीयांच्या मालकीच्या कंपनीला 2000 कोटीची मिळकत अवघ्या 50 लाखात!

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**‘नॅशनल हेरॉल्ड’ या वृत्तपत्राचे नाव पुढे करून काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि काँग्रेसच्या बड्या नेत्यांनी मोठा घपला म्हणजेच घोटाळा केल्याचे स्पष्ट होत आहे. विशेषतः, याबाबत आरोपपत्र दाखल झाल्यानंतर बरीच माहिती बाहेर पडली आहे.**




### बापरे, केवढा हा घोटाळा !

गांधी कुटुंबीयांच्या मालकीच्या एका कंपनीला सुमारे दोन हजार कोटी रुपयांची मालमत्ता अवघ्या ५० लाख रुपयात देण्यात आल्याचे त्याचप्रमाणे असे अनेक गैरमार्गाचे उत्पन्न त्यांच्या कंपनीकडे वळवल्याचे भक्कम पुरावे असल्याचे या आरोपपत्रात म्हटले आहे.

### ‘ईडी’ चे आरोपपत्र झणझणीत अंजन घालणारे..

काँग्रेसच्या ‘नॅशनल हेराल्ड’ वृत्तपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (ए जे एल)शी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने अर्थात ईडीने पहिले आरोपपत्र दाखल केले. यात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसेच गांधी घराण्याचे सल्लागार सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे या नेत्यांची नावे आहेत. त्यामुळे पहिल्यांदाच कॉंग्रेसच्या बड्या नेत्यांची नावे आरोपपत्रात दाखल झाली आणि त्यामुळे एकच गोंधळ उडाला आहे.

### वाड्रा, सोनिया आणि राहुल गांधी..

सोनिया गांधी यांचे जावई आणि प्रियांका यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांना मंगळवारी ईडी ने समन्स बजावले आणि त्यांची तब्बल सहा तास चौकशी झाली. एका जमीन गैरव्यवहार प्रकरणात हे समन्स होते. त्यांची चौकशी सुरू असतानाच हे आरोपपत्र दाखल झाले. एकाच दिवशी गांधी घराण्यातील तिघांवर अशा प्रकारची कारवाई करण्यात आली आहे. दुसरीकडे, कॉंग्रेसच्या बड्या नेत्यांनी या सूडाचे राजकारण असा आरोप देखील केला आहे.

### नेमके काय आहे हे प्रकरण?

सोनिया गांधी आणि राहुल गांधी ज्या प्रकरणामुळे अडचणीत आलेत, ते नॅशनल हेराल्ड प्रकरण नेमके काय आहे, याविषयी सर्वांनाच उत्सुकता आहे. काँग्रेस पक्ष, ‘ए जे एल’ आणि ‘यंग इंडियन कंपनी’ या तीन कंपन्यांमधील हा सगळा घोटाळा आहे.

### पं. नेहरूंनी केली स्थापना..

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९३८ मध्ये ‘ए जे एल’ ही कंपनी स्थापन केली होती. काँग्रेसच्या विचारांना प्रसिद्धी देण्यासाठी नॅशनल हेरॉड हे वृत्तपत्र छापून प्रसिद्ध करणे यासाठी या कंपनीची स्थापना होती. ती शेअर बाजारात न नोंदवलेली अनलिस्टेड कंपनी होती. त्यावेळी पंडित नेहरूंनी जाहीर आवाहन करून ५०० जणांकडून पैसे गोळा केले होते आणि त्यांना कंपनीचे शेअर्स दिले होते. त्यानंतर स्वातंत्र्य मिळाले आणि या कंपनीला अनेक शहरांमध्ये सरकारी मालमत्ता फुकट किंवा किरकोळ सवलतीच्या दरात देण्यात आल्या. त्याकाळी या जागांचा उपयोग वृत्तपत्र चालवणे किंवा समाज प्रबोधन करणे हा दाखवण्यात आला होता.

### वृत्तपत्र बंद, मालमत्ता हडप!

मात्र २००८ मध्ये काँग्रेस सत्तेत असताना वृत्तपत्र छापण्याचे काम कंपनीने बंद केले आणि सर्व मालमत्ता भाड्याने देऊन दरमहा करोडो रुपये भाडे घेण्यास सुरुवात केली. या दरम्यानच्या काळात या ‘ए जे एल’ कंपनीला काँग्रेस पक्षाने ९०.२१ कोटी बिनव्याजी कर्ज दिले. हे पैसे काँग्रेस पक्षाने घेतलेल्या वर्गणीतून आणि देणग्यामधून मिळवले होते. अर्थातच, इन्कम टॅक्स मध्ये शंभर टक्के सूट मिळाली होती.

### डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांचा दावा आणि सोनिया गांधींची खेळी !

हे संपूर्ण प्रकरण पूर्णपणे चव्हाट्यावर आणणाऱ्या डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांच्या मते सोनिया गांधी यांनी २०१० मध्ये एक नवीन कंपनी स्थापन केली आणि यंग इंडियन असे तिचे नाव ठरले. जरी स्थापनेच्या उद्देशात ती ‘नॉट फॉर प्रॉफिट’ कंपनी दाखवली असली तरी कंपनीद्वारे विशेष कोणतीही समाजोपयोगी कामे केली जात नव्हती आणि कंपनीचे भांडवल फक्त पाच लाख रुपये होते. या कंपनीमध्ये सोनिया गांधी राहुल गांधी यांचे ७६% शेअर्स आहेत आणि उरलेले २४% शेअर्स काँग्रेसचे नेते मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस या मंडळींचे आहेत. एका अर्थाने सोनिया आणि राहुल गांधी हेच या कंपनीचे मालक आहेत. मुख्य म्हणजे या संपूर्ण व्यवहारांमध्ये ‘ए जे एल’ कंपनीची सुमारे दोन हजार कोटी रुपयांची मालमत्ता केवळ पन्नास लाख रुपयांमध्ये यंग इंडियन कंपनीकडे हस्तांतरित झाली. यातील मोतीलाल व्होरा आणि ऑस्कर फर्नांडिस यांचे निधन झाले असल्यामुळे संपूर्ण मालकी आता गांधी मायलेकांकडे आहे.

# रुग्णालयावर कारवाई कधी होणार?

## » चौथा अहवाल मंगळवारी शासनाला सादर झाला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाकडून उपचारात हलगर्जीपणा झाल्याने गर्भवतीचा मृत्यू झालेल्या प्रकरणाचा चौथा अहवाल मंगळवारी रात्री उशिरा शासनाला सादर झाला आहे. त्यावर दोन दिवसात निर्णय होईल. कठोर कारवाई अपेक्षित असल्याचे आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.**



पिंपरीत पत्रकारांशी बोलताना आमदार गोरखे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंगळवारी मुंबईत भेट घेतली. पारदर्शकपणे दोषींवर योग्य कारवाई करावी. कारवाईत दिरंगाई नको, अहवाल लवकर आला पाहिजे अशी विनंती त्यांना केली. त्यानंतर चौथा अहवाल मंगळवारी रात्री उशिरा शासनाला सादर झाला आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसात निर्णय होईल. कठोर कारवाई अपेक्षित आहे.इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) ही संघटना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रुत घैसास यांच्या पाठिशी उभी आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांनी डॉ. घैसास यांनी गर्भवतीवर योग्य उपचार केले आहेत. त्यांची चूक नसून त्यांना दोषी ठरवणे चुकीचे असल्याचे म्हटले आहे. याबाबत विचारले असता आमदार गोरखे म्हणाले, 'डॉ. कदम खोटे बोलत आहेत. डॉक्टर असूनही त्यांचा अभ्यास कच्चा आहे. डॉ. घैसास यांनी दिलेली अनामत रकमेची पावती पहावी. डॉ. कदम यांनी गर्भवती मातेची बदनामी केली आहे. ती थांबवावी. महिलेला कर्करोग होता, विविध थेरिपी झाल्याचे डॉ. कदम सांगत आहेत. अशा थेरिपीत आठ महिन्याचे बाळंतपण राहू शकते का, याचा बोलण्यापूर्वी डॉक्टरांनी विचार केला पाहिजे. कोणतीही थेरिपी झाली नाही. चार एप्रिल २०२४ मध्ये डॉ. घैसास यांनी डॉ. मानसी घैसास यांच्याकडे इन व्रिटो गर्भधारणा (आयव्हीएफ) उपचार पद्धती घेण्याचा सल्ला गर्भवतीला दिला होता. दीड वर्षे डॉ. घैसास यांच्या मार्गदर्शनाखालीच उपचार सुरु होते. परंतु, रुग्णाने डॉ. मानसी यांच्याऐवजी दुसरीकडे आयव्हीएफचे उपचार घेतले. त्यामुळे पूर्वग्रहदूषितपणे डॉ. घैसास यांनी अगोदर २० लाख रुपये मागितले. त्यानंतर दहा लाख रुपये मागितले, अनामत रक्कम लिहून दिली'.पिंपरीत पत्रकारांशी बोलताना आमदार गोरखे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंगळवारी मुंबईत भेट घेतली. पारदर्शकपणे दोषींवर योग्य कारवाई करावी. कारवाईत दिरंगाई नको, अहवाल लवकर आला पाहिजे अशी विनंती त्यांना केली. त्यानंतर चौथा अहवाल मंगळवारी रात्री उशिरा शासनाला सादर झाला आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसात निर्णय होईल. कठोर कारवाई अपेक्षित आहे.इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) ही संघटना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रुत घैसास यांच्या पाठिशी उभी आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांनी डॉ. घैसास यांनी गर्भवतीवर योग्य उपचार केले आहेत. त्यांची चूक नसून त्यांना दोषी ठरवणे चुकीचे असल्याचे म्हटले आहे. याबाबत विचारले असता आमदार गोरखे म्हणाले, 'डॉ. कदम खोटे बोलत आहेत. डॉक्टर असूनही त्यांचा अभ्यास कच्चा आहे. डॉ. घैसास यांनी दिलेली अनामत रकमेची पावती पहावी. डॉ. कदम यांनी गर्भवती मातेची बदनामी केली आहे. ती थांबवावी. महिलेला कर्करोग होता, विविध थेरिपी झाल्याचे डॉ. कदम सांगत आहेत. अशा थेरिपीत आठ महिन्याचे बाळंतपण राहू शकते का, याचा बोलण्यापूर्वी डॉक्टरांनी विचार केला पाहिजे. कोणतीही थेरिपी झाली नाही. चार एप्रिल २०२४ मध्ये डॉ. घैसास यांनी डॉ. मानसी घैसास यांच्याकडे इन व्रिटो गर्भधारणा (आयव्हीएफ) उपचार पद्धती घेण्याचा सल्ला गर्भवतीला दिला होता. दीड वर्षे डॉ. घैसास यांच्या मार्गदर्शनाखालीच उपचार सुरु होते. परंतु, रुग्णाने डॉ. मानसी यांच्याऐवजी दुसरीकडे आयव्हीएफचे उपचार घेतले. त्यामुळे पूर्वग्रहदूषितपणे डॉ. घैसास यांनी अगोदर २० लाख रुपये मागितले.

### येत्या दोन दिवसात निर्णय होईल

पिंपरीत पत्रकारांशी बोलताना आमदार गोरखे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंगळवारी मुंबईत भेट घेतली. पारदर्शकपणे दोषींवर योग्य कारवाई करावी. कारवाईत दिरंगाई नको, अहवाल लवकर आला पाहिजे अशी विनंती त्यांना केली. त्यानंतर चौथा अहवाल मंगळवारी रात्री उशिरा शासनाला सादर झाला आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसात निर्णय होईल.

# थकबाकीदारांच्या मालमत्तांचा आता लिलाव

## » 100 मिळकतींचा पुणे महापालिकेकडून लिलाव केला जाणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मिळकतकर भरण्यासाठी नोटिसा बजावूनदेखील मिळकतकर न भरल्यामुळे जप्त केलेल्या १०० मिळकतींचा पुणे महापालिकेकडून लिलाव केला जाणार आहे. या मिळकती मिळकतकर विभागाने गेल्या वर्षी जप्त केल्या आहेत.**




नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात मिळकतकर विभागाला २७०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी २३०० कोटी रुपयांचे उत्पन्न गाठण्यात मिळकतकर विभागाला यश आले. उत्पन्न वाढीसाठी महापालिकेच्या वतीने अनेक उपाययोजना करण्यात आल्या. गेल्या वर्षी मिळकतकर न भरणाऱ्या शंभर मिळकती महापालिकेने जप्त केल्या आहेत. या जप्त मिळकतींचा लिलाव करून त्यामधून थकबाकी वसूल करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यापूर्वी मिळकतकर विभागाने लिलाव जाहीर केला होता. मात्र, त्याला प्रतिसाद मिळाला नव्हता.गेल्या वर्षी जप्त करण्यात आलेल्या ९० ते १०० मिळकतींच्या मूल्यांकनाची प्रक्रिया पार पडली आहे. त्यानंतर लिलाव करण्याची प्रक्रिया पुढे सरकली नव्हती. आता ही प्रक्रिया केली जाणार आहे. सध्या मिळकतींवर बोजा चढविण्याचे काम सुरू आहे.

### लिलावाची तारीख जाहीर केली जाईल

होते. त्यापैकी २३०० कोटी रुपयांचे उत्पन्न गाठण्यात मिळकतकर विभागाला यश आले. उत्पन्न वाढीसाठी महापालिकेच्या वतीने अनेक उपाययोजना करण्यात आल्या. गेल्या वर्षी मिळकतकर न भरणाऱ्या शंभर मिळकती महापालिकेने जप्त केल्या आहेत. या जप्त मिळकतींचा लिलाव करून त्यामधून थकबाकी वसूल करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

ते पूर्ण झाल्यानंतर आठ दिवस अगोदर लिलावाची तारीख जाहीर केली जाईल. या काळात थकबाकीदारांनी थकबाकीची रक्कम महापालिकेकडे भरल्यास त्यांची मालमत्ता लिलावामधून वगळण्यात येईल, असे मिळकत कर विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी सांगितले.पाटील म्हणाल्या, महापालिकेच्या मिळकतकर विभागाने गेल्या वर्षी जप्त केलेल्या मिळकतींचे मूल्यांकन झालेले आहे. लवकरच या मिळकतींची लिलाव प्रक्रिया पूर्ण करून थकबाकी वसूल केली जाणार आहे. लिलाव होणाऱ्या मिळकतदारांनी थकबाकी भरल्यास त्या मिळकतींना लिलावामधून वगळले जाईल. संपलेल्या आर्थिक वर्षात मिळकतकर विभागाला २७०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले

## नागरिकांनी सहकार्य करावे : महापालिका

# वेळेत कर भरण्याचे महापालिकेकडून आवाहन!

### बचत गटातील महिलांच्या माध्यमातून आजपासून घरपोच बिले वाटप सुरु

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका करआकारणी व करसंकलन विभागाकडून सन २०२५-२६ या वर्षाची मालमत्ता कराची बिले वितरण करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अंतर्गत प्रशासकीय नियंत्रणाखाली महिला बचत गटातील महिलांना मालमत्ता कराची बिले वितरण करण्यापूर्वीचे प्रशिक्षण मंगळवारी (दि.१५) यशस्वीरीत्या देण्यात आले. हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांसाठी उपयुक्त ठरत आहे.**




> मिळकतकर बिले मिळाल्यानंतर त्यांचा तात्काळ भरणा करणे ही प्रत्येक करदात्याची जबाबदारी आहे. वेळेत कर भरल्यास महापालिकेला वेळेवर महसूल मिळतो आणि नागरी सेवा अधिक चांगल्या पद्धतीने देता येतात. नागरिकांनी बिले स्वीकारताना वितरकांना सहकार्य करावे आणि कोणतीही अडचण असल्यास संबंधित विभागाशी संपर्क साधावा.
> **–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> घरोघरी मिळकत कराचे बिल वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे माहे जूनपूर्वी वेळेत आगाऊ संपूर्ण कराचे बिल भरून करसवलतीचा नागरिकांना लाभ घेता येईल. त्याचबरोबर मालमत्तेशी मोबाईल क्रमांक बिनचूक जोडणी केल्यास मालमत्तेशी संबंधित अद्ययावत माहिती मोबाईलवर उपलब्ध होईल.
> **–प्रदीप जांभळे– पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका

या प्रशिक्षणात बोलतांना महापालिकेच्या कर आकारणी व करसंकलन विभागाचे प्रमुख अविनाश शिंदे यांनी महिलांना मालमत्ता कर प्रणालीविषयी प्राथमिक माहिती दिली. तसेच करआकारणीची प्रक्रिया, बिलाचे स्वरूप, बिल वाटप, अँप्लिकेशनबाबतची माहिती, त्यामधील विविध तपशील, तसेच बिले वितरण करताना घ्यावयाची दक्षता, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. बिलांचे वितरण करताना नागरिकांशी संवाद कसा साधावा, शंका कशा सोडवाव्यात, यावरही प्रशिक्षणात विशेष भर देण्यात आला. महिलांनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रश्नोत्तरांच्या सत्रात आपले अनुभव आणि समस्या व्यक्त केल्या. महिलांच्या समस्यांचे समाधान संबंधित अधिकाऱ्यांनी केले.

महापालिकेने सन २०२५-२६ हे आर्थिक वर्ष १ एप्रिल पासून सुरु झाले आहे. या वर्षीची मिळकतकर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे. त्याचबरोबर महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिला बचत गटातील महिलांना प्रशासकीय ओळखपत्र देण्यात आले आहे. या महिलांच्या माध्यमातून नागरिकांना १६ एप्रिलपासून घरोघरी वितरित केली जाणार आहेत.

ज्या मालमत्ता कर बिलांवर "थकबाकीदार" असा शिक्का आहे त्याबरोबर त्यांना जप्तीपूर्व नोटीस बजावली जाणार आहे. बिले वितरित करताना ती मालमत्ताधारकाच्याच स्वाधीन करण्यात येणार आहेत. त्यामुळे संबंधित सोसायट्यांचे अध्यक्ष, सचिव, सुरक्षारक्षक यांनी कोणतीही अडथळा न करता वितरक महिलांना प्रवेश आणि सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे महिलांना महापालिकेसोबत काम करण्याची संधी उपलब्ध झाली असून, त्यांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. त्याचबरोबर नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. 'सिद्धी' प्रकल्पाच्या माध्यमातून महापालिका केवळ महसूल वाढवण्यावर भर देत नाही, तर सामाजिक सहभाग, महिला सबलीकरण आणि कार्यक्षम सेवा वितरण हेही समान महत्त्वाने साध्य करत आहे.

महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महापालिकेने महिला आर्थिक विकास सोपवली आहे. महिलांनी प्रशिक्षण घेऊन हे कार्य पार पाडण्यासाठी तयारी दर्शवली आहे. बिले वाटप करणाऱ्या बचतगटातील महिलांना सहकार्य करून मिळकत कराची बिले स्वीकारावेत. तसेच मोबाईल क्रमांक अद्ययावत करून घ्यावा, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

## पोलीस आयुक्तालयाच्या नवीन अधिकृत वेबसाईटचे लोकार्पण

### नागरिकांना जास्तीत जास्त प्रशासकीय सेवा वेळेत उपलब्ध होणार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसीय कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने नागरिकांना जास्तीत जास्त प्रशासकीय सेवा वेळेत उपलब्ध होण्याकरीता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या नव्याने नूतनीकरण केलेल्या (HTTPS://PCPC.GOV.IN) या अधिकृत वेबसाईटचे लोकार्पण पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केले.**



सदर वेबसाईट मध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनची माहिती, लोकेशन व पोलीस स्टेशनचे फोटो तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मोबाईल नंबरसह अपलोड केली आहे. सायबर पोलीस स्टेशनकडून महत्वाचे लिंक/संकेतस्थळे तसेच सायबर फसवणुकीबाबतचे जनजागृतीचे विविध व्हिडीओ अपलोड केले आहेत.

**मुख्यमंत्री यांचे १०० दिवसीय कृती कार्यक्रमासाठी स्वतंत्र टॅब**

राज्य सरकारने सुरु केलेल्या १०० दिवसीय कृती कार्यक्रम अंतर्गत पोलीस विभागामार्फत करण्यात येणा-या कामगिरीचा आढावा, प्रगती व माहिती नागरिकांना या स्वतंत्र टॅबद्वारे सहज मिळणार आहे.

**नागरिकांना फीडबॅक फॉर्म :**

नागरिकांना फीडबॅक फॉर्म कोणत्याही नागरिकांना पोलीस स्टेशनला भेट दिल्यानंतर नागरिकांना पोलीस कर्मचा-यांच्या वर्तनाबाबत आपले अनुभव शेअर करता यावेत म्हणून नव्याने फीडबॅक फॉर्म तयार करण्यात आले असून त्यामुळे सेवा सुधारण्यात मदत होईल आणि जबाबदारीची भावना बळकट होईल.

**भाडेकरूंच्या माहितीकरीता स्वतंत्र विभाग**

भाडेकरूंची माहिती पोलीस स्टेशनमध्ये नोंदवणे आता अधिक सोपे झाले आहे. नव्या टॅबमुळे नागरिकांना ऑनलाईन पध्दतीने ही माहिती भरता येईल. ज्यामुळे गुन्हेगारीस प्रतिबंध करणेस मदत होईल.


**ई चलन टॅब**

वाहतूक चलनांची माहिती आणि ऑनलाईन दंड भरण्यासाठी स्वतंत्र टॅब तयार करण्यात आला आहे. यामुळे वाहतूक नियमांचे पालन अधिक प्रभावीपणे होईल आणि नागरिकांचा वेळ वाचेल.

**सोशल मीडियासह थेट संपर्क**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना वेबसाईटवरुन सहज जोडले गेले आहे. नागरिक आता थेट सोशल मीडिया वरुन पोलिसांशी संवाद साधू शकतात, तक्रारी, सूचना माहिती शेअर करु शकतात.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### व्यावहारिक वासना तृप्त करण्यासाठी संत नसतात

नोकरी पाहिजे असेल तर ती देणारा जिथे असतो तिथे आपण जातो; त्याप्रमाणे भगवंताची भेट घ्यायची असेल तर संत जिथे राहतात तिथे आपण जावे. परमेश्वराचे स्वरूप ओळखण्यासाठी संतांकडे जाणेच जरूर आहे. संतांचे अस्तित्व त्यांच्या देहात नसून त्यांच्या वचनात आहे. संतांजवळ निर्विषय चित्त असते. रात्री सर्वजण झोपल्यावर शिपाई जसे गस्त घालतात, तसे साधुसंत आमच्या गैरसावधतेत जागृत असतात. आपण झोपी गेलो असताना ते आपली वृत्ती तपासतात. एका बाईला मूल झाले. पण त्याला आकडी येऊ लागली. ते पाळण्यात उगीच निपचित पडून असायचे. ते मूल बरोबर वाढेना, चांगले हसेना, खेळेना. मुलाची ती अवस्था पाहून आईला बरे वाटत नसे. अगदी तसेच संतांना वाटते. शिष्य केला खरा, पण साधनात जर त्याची प्रगती होत नसेल तर संताला वाईट वाटते : शिष्याची प्रगती होत असेल तर संत स्वतःच्या प्रेमापोटीच शिष्याला सजवील आणि त्याचे कौतुक करील. संतांना फारसे कधी कोणी चांगले म्हणत नाही. त्यांनी एकाचे कल्याण केले तर त्या माणसाचे दहा नातेवाईक त्यांना नावे ठेवतात. संतांना ओळखण्याकरिता जे गुण सांगितले आहेत ते त्यांची परीक्षा करण्याकरिता सांगितले नसून, त्यांचा त्या दृष्टीने उपयोगी होत नाही. त्या गुणांचे आपण आचरण करावे म्हणून ते सांगितलेले आहेत. संतांजवळ राहणाऱ्या लोकांना तीन तोटे आणि तीन फायदे असतात. त्यांपैकी तोटे असे की, एक, वेदान्त बोलायला तेवढा उत्तम येतो; दोन, संतांजवळ राहिल्याने उगीच मान मिळतो; आणि तीन, 'ते, म्हणजे संत, सर्व पाहून घेतील' या खोट्या भावनेने हा वाटेल तसे वागतो. आता फायदे पाहू. पहिला म्हणजे, तो जर खऱ्या भावनेने संतांजवळ राहील तर तेवढ्यानेच, काही साधन न करतासुद्धा, त्याचा परमार्थ साधेल; दुसरा, त्याला मान मिळेल, पण तो स्वतः मानाच्या अपेक्षेच्या पलीकडे राहील; आणि तिसरा, वेदान्त त्याला बोलायला आला नाही तरी त्याच्या आचरणात येईल. म्हणून संतांजवळ राहणाऱ्याने ते सांगतील तसे वागावे, मानाची अपेक्षा करू नये आणि फारसा वेदान्त बोलू नये. तोंडापर्यंत आले तरी दाबून टाकावे. संतांची आज्ञा प्रमाण मानणे हे प्रचीती येण्याचे साधन आहे. व्यावहारिक वासना तृप्त करण्यासाठी संत नसतात, हे ओळखून आपण त्यांची संगत करावी. तेल आणि वात असल्यावर दिवा लावायला जसा वेळ लागत नाही, त्याचप्रमाणे आपली भूमिका थोडी तयार असल्यावर सत्संगतीचा परिणाम व्हायला वेळ लागत नाही.

**बोधवचन:- संतांना ओळखण्यासाठी अनुसंधानाशिवाय दुसरे साधन नाही.**

# संजय, विजय,पटोलेंचे नाना, भाजपाच्या नावानं ठणाणा !







'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**विरोधकांना अजूनही म्हणावा तसा सूर सापडलेला नाही. विधानसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात आणि लोकसभा निवडणुकीनंतर देशभरात विरोधी पक्षांमधील वातावरण बेसूर आणि भरपटलेलेच आहे.**

### लोकसभेत भाजपाचे स्वप्न भंगले..

लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला चारशे पेक्षा जास्त जागा मिळवू न देण्यामध्ये विरोधकांना यश आले होते. त्यानंतर सत्तारूढ म्हणजेच भाजपाची बाजी विधानसभा निवडणुकीमध्ये पलटेल आणि महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी, उबाठा सेना यांना किमान समाधानकारक जागा मिळतील अशी आशा त्यांच्या नेत्यांमध्ये निर्माण झाली होती. परंतु, लाडक्या बहिणींनी केलेल्या मतदानामुळे विरोधकांचे मनसुबे धुळीस मिळाले. आता हवा गेलेल्या फुग्याप्रमाणे त्यांची अवस्था झाली आहे.

### पवार गट संयमी, इतरांचा थयथयाट !

शरद पवार यांनी त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबाबत बऱ्यापैकी संयमाची भूमिका घेतली आहे. शारीरिक आणि मानसिक धक्क्यामुळे कदाचित सध्या ते शांत असावेत, मात्र, ही शांतता आणि धारण केलेले मौन एका अर्थाने त्यांच्या दृष्टीने पचनी पडणारे आहे.. पडलेले आहे !

### रोजची बडबड, तोंडाच्या वाफा...

काँग्रेस आणि उबाठासेना यांना मात्र संयम नावाचा शब्द आणि भावना, कृती असते याचा पूर्ण विसर पडला आहे. दररोज काही ना काही बडबडल्याशिवाय तोंडची वाफ दवडल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. साहजिकच, ते जेवढे बडबडतील तेवढा लाभ भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्र पक्षांना होणार आहे. विजय वडेट्टीवार, नाना पटोले किंवा नव्याने प्रदेशाध्यक्ष झालेले हर्षवर्धन सपकाळ ही सर्व मंडळी एकाच धाग्यात गुंतल्यामुळे 'एका माळेचे मणी' वाटू लागले आहेत. या तिघांमध्ये कमालीचे वैचारिक साम्य आणि वाचिक समता आहे. कोणते वाक्य कोण बोलले, हे समजू नये इतके बेमालून, एकरूप विचार या तिघांचे आहेत. त्यामुळे एकाला झाकावे आणि दुसऱ्याला काढावे, असे म्हणण्यापेक्षा सगळ्यांनाच उघडे ठेवले तरी फरक पडणार नाही अशी काँग्रेसची अवस्था आहे.

### जुन्या नेत्यांच्याकडे धुरा हवी होती..

जुन्या जाणत्या ज्येष्ठ नेत्या यशोमती ठाकूर हा त्यातल्या त्यात बरा पर्याय काँग्रेसकडे होता. त्याचबरोबर सतेज पाटील यांच्याकडे काँग्रेसची धुरा देणे योग्य झाले असते आणि गेला बाजार पक्षातील एकमेव समंजस नेता पृथ्वीराज चव्हाण यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष केले असते, तर किमान दररोज ही मंडळी ज्या प्रकारे तोंडची वाफ घालवत आहेत, ती सर्वसामान्यांना सहन करावी लागली नसती. आक्रमक प्रचार आणि बेताल वक्तव्य यातला फरक विजय वडेट्टीवार आणि नाना पटोले यांना आज अखेर समजलेला नाही.

### वडेट्टीवारांचा हाच का पुरुषार्थ ?

मंगेशकर कुटुंबीय वडेट्टीवार यांचे देणे लागत असल्याप्रमाणे वडेट्टीवारांनी ज्या प्रकारे त्या कुटुंबावर आरोप केले, ते निषेधार्थ आहेतच. परंतु वाटेल ते बोलण्यामध्ये पुरुषार्थ आहे, असे मानणाऱ्या वडेट्टीवार यांना हे समजून कोण सांगणार आणि ते स्वतः समजून कधी घेणार? या तिघांचा अर्क संजय राऊत हे उबाठासेनेचे खासदार प्रवक्ते आहेत. खरे तर संजय राऊत यांच्याविषयी काही लिहावे, बोलावे असा विषय राहिलेला नाही. आपण काय बोलतो, त्याचे भूत, भविष्यकाळातील संबंध, परिणाम काय आहेत, याचा विचार ते करतच नसल्याने त्यांचे दररोजचे त्यांच्या पक्षासंदर्भातले आणि सत्तारूढ पक्षसंदर्भातले विचार हास्यास्पद असतात, हे सगळ्यांना मान्य आहेच !

### उबाठाची अवस्था अत्यंत केवीलवाणी..

संभाजीराजे छत्रपती आणि शाहू महाराज छत्रपती यांचा अपमान भारतीय जनता पक्षाने केला, असे सांगताना ते संभाजी महाराज छत्रपती यांनी उद्धव ठाकरे यांच्या संदर्भात केलेली विधाने जाणीवपूर्वक विसरतात. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी संभाजीराजे छत्रपती यांचा केलेला अपमान ते झाकून ठेवतात. एवढेच नव्हे तर राज्यसभेवर उमेदवारी करत असताना संभाजीराजे छत्रपती यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे पक्षाचा पाठिंबा मागितल्यावर आमच्या पक्षात आला, तर आम्ही पाठिंबा देऊ, अशी अट घालून त्यांच्यापेक्षा आपला पक्ष मोठा असल्याचे दाखवून देण्याचा विसर आठवतो का ? आणि त्यातून आपण अपमान केला आहे ही, भावना संजय राऊत उद्धव ठाकरे यांच्या गावीही नव्हती. मात्र, रायगड उत्सव समितीने संभाजीराजे छत्रपती यांना निमंत्रण दिले नाही याचे खापर ज्या पद्धतीने राऊत भाजपावर फोडत आहेत, तो प्रकारच केविलवाणा आहे.

### वंशज असल्याचा पुरावा कोणी मागितला ?

छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करत गृहमंत्री अमित शहा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला. त्यांच्यावर गुन्हा दाखल करा असे म्हणणारे संजय राऊत, खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे यांना ते छत्रपती असल्याचा पुरावा मागतात. यावरून अपमानास्पद विचार आणि कृती करणारी मंडळी कोण, याचा उलगडा होतो. त्यातूनही अमित शहा यांनी दोन, तीन वेळा छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केला असेल. मात्र, संजय राऊत गेले तीन दिवस छत्रपती शिवाजी महाराजांचा अमित शहा यांनी कसा एकेरी उल्लेख केला हे दाखवत दररोज डझनभर वेळा छत्रपती शिवरायांचा एकेरी उल्लेख करतात, त्याची जाणीवही त्यांना होत नाही. हे एकीकडे गंभीर आणि दुसरीकडे अज्ञान दर्शवणारे आहे, हे सर्वांना कळते !

### अडाणी, असंबद्ध, अविवेकी, अर्धवट

थोडक्यात, काँग्रेस आणि उबाठासेना अडाणी, असंबद्ध, अविवेकी, अर्धवट, अनाकलनीय, अतार्किक वक्तव्य करण्याच्या कोण आघाडीवर या स्पर्धेत आहेत. खरे तर दोघांनाही या स्पर्धेत एकत्रितरीत्या विजयी घोषित केले तरी चालणारे आहे. ताळतंत्र नसलेल्या या नेत्यांच्या विचारांना मतदार जनता फारसे गांभीर्याने घेत नाही आणि घेऊ ही नये. मग संजय राऊत, विजय वडेट्टीवार, हर्षवर्धन सपकाळ किंवा नाना पटोले यांच्यात सुरू असलेला ठाणाणा..याकडे सगळ्यांचे दुर्लक्ष आहे, त्याकडे लक्ष देण्यासाठी कोणालाही वेळ नाही, हेच खरे खरे!

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भाजपा हिंदुत्ववादी हेच फेक नरेटिव्ह!

## एकमेकांमध्ये दगड मारायला लावायचे भाजपाचं काम : उद्धव ठाकरे

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजपा हिंदुत्ववादी आहे हेच मोठं फेक नरेटिव्ह आहे. नितीश कुमारांसह केंद्रात युती केली आहे. हे नितीश कुमार संघमुक्त भारत झाला पाहिजे असं म्हणाले होते. चंद्राबाबू नायडू यांच्यासह भाजपाने हात मिळवणी केली आहे. चंद्राबाबू मोदींना अतिरेकी म्हणाले होते आणि मोदी चंद्राबाबूंना यू टर्न बाबू म्हणाले होते. पण आता सत्तेत एकत्र बसलेत. मला एक अशी गोष्ट सांगा जी त्यांनी केली आहे आणि मी केली आहे. मग कुठल्या तोंडाने माझ्यावर हिंदुत्व सोडल्याची टीका करत आहात? तुमचं बुरसटलेलं हिंदुत्व आम्हाला मान्य नाहीच. आम्ही भाजपाला सोडलं आहे हिंदुत्व सोडलेलं नाही. नाशिकमध्ये निर्धार शिबीराला उद्धव ठाकरेंनी मार्गदर्शन केलं. त्यावेळी त्यांनी भाजपावर जोरदार टीका केली.**



भ्रम निर्माण करायचा एकमेकांमध्ये दगड मारायला लावायचे, मग बटेंगे तो कटेंगे, तिकडे बाटेंगे तो जितेंगे यांचं चाललंय काय? शेतात बैल जातो लघुशंका करताना कसा जातो वाकडातिकडा तसं जाऊ नका. सरळ जा मग आम्हाला कळेल की तुम्ही खरे हिंदुत्ववादी आहात. पण एकदा धरायचं, एकदा मारायचं मग सौगात द्यायची, एकदा अमुक करायचं, एकदा तमुक करायचं म्हणजे नेमकी यांची भूमिका काय? आजवर आम्ही कधी जाऊन नवाज शरीफच्या वाढदिवसाचा केक खाऊन आलो नाही. आमच्यापैकी कुणीही जाऊन जिनाच्या थडग्यावर डोकं टेकून आलं नाही. या देशातले मुस्लिम, देशप्रेमी मुस्लिम, मोहन भागवतही म्हणाले मुस्लिमही शाखेत येऊ शकतात पण ते देशप्रेमी असले पाहिजेत. आता माझा मोहन भागवत यांना सवाल आहे ३२ लाख कुटुंबाना जी सौगात वाटली त्यात ओळखलं कसं त्यांच्यापैकी कोण देशप्रेमी कोण देशद्रोही आहे? आपल्याकडे गोवंश हत्याबंदी आहे. माझा त्याला विरोध नाही. किरण रिजेजू बोलले होते की ते गोमांस खातात ते तुमचे मंत्री. ज्यांचा संशय येतो त्यांना पाठलाग करुन मारलं गेलं. नेमका तुमच्या हिंदुत्वाला शेंडा बुडखा, आकार, उकार आहे की नाही? या सगळ्या गोष्टी पाहिल्यानंतर आता आपल्यावर म्हणजे महाराष्ट्रावर मोठी जबाबदारी आहे. महाराष्ट्र देशाला दिशा दाखवत आला हे आपण इतिहासात वाचलं आहे. असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव मी पराभव मानायला तयार नाही. आज जर बॅलेट पेपरवर निवडणूक घेतली तर यांच्यापेक्षा जास्त संख्येने आपली मायबाप जनता आपल्याला निवडून देईल हा माझा विश्वास आहे. आपण मोठे केलेले गद्दार उफराटे निघाले तरीही माझ्या महाराष्ट्रातल्या माता भगिनी आणि माझे बांधव असे उलट्या काळजाचे होऊ शकत नाही. छत्रपतींचा महाराष्ट्र यांना यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.भ्रम निर्माण करायचा एकमेकांमध्ये दगड मारायला लावायचे, मग बटेंगे तो कटेंगे, तिकडे बाटेंगे तो जितेंगे यांचं चाललंय काय? शेतात बैल जातो लघुशंका करताना कसा जातो वाकडातिकडा तसं जाऊ नका. सरळ जा मग आम्हाला कळेल की तुम्ही खरे हिंदुत्ववादी आहात. पण एकदा धरायचं, एकदा मारायचं मग सौगात द्यायची, एकदा अमुक करायचं, एकदा तमुक करायचं म्हणजे नेमकी यांची भूमिका काय? आजवर आम्ही कधी जाऊन नवाज शरीफच्या वाढदिवसाचा केक खाऊन आलो नाही. आमच्यापैकी कुणीही जाऊन जिनाच्या थडग्यावर डोकं टेकून आलं नाही.या देशातले मुस्लिम, देशप्रेमी मुस्लिम, मोहन भागवतही म्हणाले मुस्लिमही शाखेत येऊ शकतात पण ते देशप्रेमी असले पाहिजेत.

### महाराष्ट्रावर मोठी जबाबदारी आहे

आता माझा मोहन भागवत यांना सवाल आहे ३२ लाख कुटुंबाना जी सौगात वाटली त्यात ओळखलं कसं त्यांच्यापैकी कोण देशप्रेमी कोण देशद्रोही आहे? आपल्याकडे गोवंश हत्याबंदी आहे. माझा त्याला विरोध नाही. किरण रिजेजू बोलले होते की ते गोमांस खातात ते तुमचे मंत्री. ज्यांचा संशय येतो त्यांना पाठलाग करुन मारलं गेलं. नेमका तुमच्या हिंदुत्वाला शेंडा बुडखा, आकार, उकार आहे की नाही? या सगळ्या गोष्टी पाहिल्यानंतर आता आपल्यावर म्हणजे महाराष्ट्रावर मोठी जबाबदारी आहे. महाराष्ट्र देशाला दिशा दाखवत आला हे आपण इतिहासात वाचलं आहे. असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# इस्त्रोतून भरारीचे पंख घेऊन परता

## नांदेड समाज कल्याणचे 60 विद्यार्थी श्रीहरीकोटाला रवाना

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजे इस्त्रो ही देशाची अंतराळ संशोधनातील महत्वाची संस्था असून या ठिकाणावरून आकाशात भरारी घ्यायचे पंख आणि त्यासाठी लागणारे बळ घेऊन परत या, अशा शब्दांमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी विद्यार्थ्यांना आज शुभेच्छा दिल्या. समाज कल्याण विभागातील ६० गुणी विद्यार्थ्यांची एक टीम शैक्षणिक सहलीसाठी श्रीहरिकोटा येथे बुधवारी रवाना झाली.**



समाज कल्याण सहाय्यक आयुक्त नांदेड कार्यालय अधिनस्त शासकिय निवासी शाळेतील विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी इस्त्रो येथे विमानाने रवाना झाले. त्यांना निरोप देताना श्रीहरीकोटा येथे आपण शैक्षणिक सहलीसाठी जातो आहे आणि त्या ठिकाणावरून नांदेडसाठी येतांना मोठ्या स्वप्नाची भरारी घेऊन येतो आहे, हे लक्षात ठेवावे असे मार्गदर्शन यावेळी त्यांनी केले. यावेळी सहायक आयुक्त समाज कल्याण शिवानंद मिनगिरे यांनी या विद्यार्थ्यांपैकी काहींनी आंतराळशास्त्र सारख्या विभागात काम केल्यास मला आनंदच होईल. हा एक प्रशिक्षण दौरा असून विद्यार्थ्यांना नव्या क्षेत्रातील भरारी देण्यासाठी राज्य शासनाने आयोजित केला आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मिनगिरे यांच्या मार्गदर्शनात हा कल्पक अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी सहायक आयुक्त समाज कल्याण शिवानंद मिनगिरे यांनी या विद्यार्थ्यांपैकी काहींनी आंतराळशास्त्र सारख्या विभागात काम केल्यास मला आनंदच होईल. हा एक प्रशिक्षण दौरा असून विद्यार्थ्यांना नव्या क्षेत्रातील भरारी देण्यासाठी राज्य शासनाने आयोजित केला आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. मिनगिरे यांच्या मार्गदर्शनात हा कल्पक अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे.महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींची शासकीय निवासी शाळा, माहूर, हदगाव, उमरी, नायगाव येथील प्रत्येकी शाळा १५ विद्यार्थी-विद्यार्थीनी असे एकूण ६० विद्यार्थी व त्यांचे काळजीवाहक म्हणुन सोबत शिक्षक, कर्मचारी हे सदर शैक्षणिक सहलीसाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) श्रीहरीकोटा येथे १६ ते १९ एप्रिल या कालावधी जात आहेत. यावेळी समाज कल्याण अधिकारी विलास केंद्रे, सेवानिवृत्त समाज कल्याण अधिकारी बापू दासरी हे उपस्थित होते. हे विद्यार्थी हैद्राबाद येथून विमानाने जाणार आहेत.

### हिरवी झेंडी दाखवून सहलीस रवाना

त्यांना बुधवारी हैद्राबादला बसने रवाना करण्यात आले. अधिकाऱ्यांनी हिरवी झेंडी दाखवून सहलीस रवाना केले. समाज कल्याण सहाय्यक आयुक्त नांदेड कार्यालय अधिनस्त शासकिय निवासी शाळेतील विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी इस्त्रो येथे विमानाने रवाना झाले.

# विद्यार्थ्याने ट्रम्पना खेचले न्यायालयात!

## भारतीय विद्यार्थ्याने हद्दपारीच्या धमक्यांविरोधात दाखल केला खटला

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेतील मिशिगन येथील विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या एका भारतीय विद्यार्थ्यासह चार आशियाई विद्यार्थ्यांनी त्यांचा विद्यार्थी इमिग्रेशन दर्जा चुकीच्या पद्धतीने रद्द केल्यानंतर अमेरिकेतून संभाव्य हद्दपारीविरुद्ध ट्रम्प प्रशासनाविरुद्ध खटला दाखल केला आहे. भारताचा चिन्मय देवरे, चीनचा झियांग्युन बु व किउई यांग आणि नेपाळच्या योगेश जोशी यांनी शुक्रवारी गृह सुरक्षा विभाग आणि इमिग्रेशन अधिकाऱ्यांविरुद्ध खटला दाखल केला.**



या चार विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या खटल्यात, असा दावा दाखल केला आहे की, त्यांचा विद्यार्थी इमिग्रेशन दर्जा स्टुडंट अँड एक्सचेंज व्हिजिटर इन्फॉर्मेशन सिस्टममध्ये "पुरेशी माहिती आणि स्पष्टीकरण न देता" बेकायदेशीरपणे रद्द करण्यात आला आहे. स्टुडंट अँड एक्सचेंज व्हिजिटर इन्फॉर्मेशन सिस्टम हा एक डेटा सेट आहे, ज्यामध्ये अमेरिकेतील बिगर-स्थलांतरित विद्यार्थ्यांची आणि शैक्षणिक कारणांसाठी अमेरिकेत आलेल्या विद्यार्थ्यांची माहिती एकत्रित केलेली असते. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अमेरिकन सिव्हिल लिबर्टीज युनियन ऑफ मिशिगनने म्हटले आहे की, "ज्या विद्यार्थ्यांचा एफ-१ विद्यार्थी इमिग्रेशन दर्जा ट्रम्प प्रशासनाने कोणत्याही वैध कारणाशिवाय आणि सूचना न देता बेकायदेशीरपणे आणि अचानक संपुष्टात आणला होता त्यांच्यावतीने आपत्कालीन मनाई आदेशाची मागणी करणारा खटला दाखल केला आहे. या विद्यार्थ्यांना पुन्हा इमिग्रेशन दर्जा बहाल करण्याची विनंती या खटल्यात न्यायालयाला करण्यात आली आहे जेणेकरून ते त्यांचे शिक्षण पूर्ण करू शकतील आणि हद्दपारीचा धोका टाळू शकतील."दरम्यान न्यायालयात दाखल केलेल्या खटल्यात म्हटले आहे की,"कारवाई करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांपैकी कोणावरही अमेरिकेत कोणताही गुन्हा, आरोप किंवा शिक्षा झालेली नाही. कोणीही कोणत्याही इमिग्रेशन कायद्याचे उल्लंघन केलेले नाही. तसेच ते कोणत्याही राजकीय मुद्द्यावरून विद्यापीठातील निदर्शनांमध्ये सहभागी नव्हते."या विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या खटल्यात गृह सुरक्षा विभागाच्या सेक्रेटरी क्रिस्टी नोएम, आयसीईचे कार्यवाहक संचालक टॉड लायन्स आणि आयसीई डेट्रॉईट फील्ड ऑफिस संचालक रॉबर्ट लिंच यांची नावे आहेत. न्यू हॅम्पशायर, इंडियाना आणि कॅलिफोर्निया सारख्या राज्यांसह देशभरात असेच खटले दाखल करण्यात आले आहेत. काही दिवसांपूर्वीच, अशाच एका प्रकरणात, एका अमेरिकन न्यायाधीशाने ट्रम्प प्रशासनाला २१ वर्षीय भारतीय पदवीधर कृष लाल इस्सरदासानी याची हद्दपारी तात्पुरते रोखण्याचे आदेश दिले होते.या चार विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या खटल्यात, असा दावा दाखल केला आहे की, त्यांचा विद्यार्थी इमिग्रेशन दर्जा स्टुडंट अँड एक्सचेंज व्हिजिटर इन्फॉर्मेशन सिस्टममध्ये "पुरेशी माहिती आणि स्पष्टीकरण न देता" बेकायदेशीरपणे रद्द करण्यात आला आहे. स्टुडंट अँड एक्सचेंज व्हिजिटर इन्फॉर्मेशन सिस्टम हा एक डेटा सेट आहे, ज्यामध्ये अमेरिकेतील बिगर-स्थलांतरित विद्यार्थ्यांची आणि शैक्षणिक कारणांसाठी अमेरिकेत आलेल्या विद्यार्थ्यांची माहिती एकत्रित केलेली असते. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अमेरिकन सिव्हिल लिबर्टीज युनियन ऑफ मिशिगनने म्हटले आहे की, "ज्या विद्यार्थ्यांचा एफ-१ विद्यार्थी इमिग्रेशन दर्जा ट्रम्प प्रशासनाने कोणत्याही वैध कारणाशिवाय आणि सूचना न देता बेकायदेशीरपणे आणि अचानक संपुष्टात आणला होता त्यांच्यावतीने आपत्कालीन मनाई आदेशाची मागणी करणारा खटला दाखल केला आहे. या विद्यार्थ्यांना पुन्हा इमिग्रेशन दर्जा बहाल करण्याची विनंती या खटल्यात न्यायालयाला करण्यात आली आहे.

### कोणत्याही विद्यार्थ्यावर गुन्हा नाही

जेणेकरून ते त्यांचे शिक्षण पूर्ण करू शकतील आणि हद्दपारीचा धोका टाळू शकतील."दरम्यान न्यायालयात दाखल केलेल्या खटल्यात म्हटले आहे की,"कारवाई करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांपैकी कोणावरही अमेरिकेत कोणताही गुन्हा, आरोप किंवा शिक्षा झालेली नाही. कोणीही कोणत्याही इमिग्रेशन कायद्याचे उल्लंघन केलेले नाही. तसेच ते कोणत्याही राजकीय मुद्द्यावरून विद्यापीठातील निदर्शनांमध्ये सहभागी नव्हते."या विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या खटल्यात गृह सुरक्षा विभागाच्या सेक्रेटरी क्रिस्टी नोएम, आयसीईचे कार्यवाहक संचालक टॉड लायन्स आणि आयसीई डेट्रॉईट फील्ड ऑफिस संचालक रॉबर्ट लिंच यांची नावे आहेत.

---

# तुम्ही भूतकाळ बदलू शकत नाही

## वक्फवरील याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संसदेच्या दोन्ही सभागृहात वक्फ (सुधारणा) विधेयक, २०२५ मंजूर झाल्यानंतर अनेकांनी त्यास विरोध केला आहे. सर्वोच्च न्यायालयात या विधेयकाला विरोध करणाऱ्या अनेक याचिका दाखल झाल्या असून आज सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर त्यावर सुनावणी पार पडली. याचिकाकर्त्यांनी सदर विधेयकाला स्थगिती देण्याची मागणी केली. मात्र सर्वोच्च न्यायालयाने आज कोणताही निकाल दिला नाही. उद्या पुन्हा सुनावणी होणार आहे.**




न्यायालयाने आज दोन महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा केली. एक म्हणजे 'वक्फ बाय युजर' या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचे उत्तर मागितले आहे. तसेच वक्फ बोर्डावर जर बिगर मुस्लीम व्यक्तींना स्थान दिले जात असेल तर हिंदू धार्मिक संस्थेवर मुस्लीम व्यक्तीला घेतले जाईल का? असाही सवाल न्यायालयाने विचारला.सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांना सांगितले की, आम्हाला सांगितले गेले की, दिल्ली उच्च न्यायालय वक्फ जमिनीवर बांधले गेले आहे. आम्ही हे म्हणत नाही की, सगळेच वक्फ बाय युजर चुकीचे आहे. पण काही ठिकाणी खरोखर चिंता व्यक्त करावी, अशी परिस्थिती आहे. वक्फ (सुधारणा) विधेयक मंजूर झाल्यानंतर देशभरात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला हिंसक वळण लागले. याबद्दल सरन्यायाधीशांनी चिंता व्यक्त केली. जेव्हा सर्वोच्च न्यायालय एखाद विषय हातात घेते, त्यानंतर त्यावर अशी हिंसक आंदोलने व्हायला नको. हिंसाचाराच्या माध्यमातून दबाव निर्माण करण्याची परिस्थिती तयार होत आहे. वक्फ कायद्यातील सुधारणा संविधानाच्या अनुच्छेद २६ चे उल्लंघन करत असल्याचा मुद्दा याचिकाकर्त्यांचे आणखी एक वकील कपिल सिब्बल यांनी मांडला. अनुच्छेद २६ नुसार सर्वांना आपापल्या धार्मिक प्रथांचे आचरण करण्याचा अधिकार मिळाला आहे. त्यामुळे वक्फमध्ये कोण कोण असणार हे सरकार कसे काय ठरवू शकते? तसेच इस्लामचे पाच वर्ष आचरण करणारे लोक कोण? हे कोण ठरविणार? वक्फमध्ये केलेल्या सुधारणांमुळे २० कोटी लोकांचे अधिकार हिसकावले जाऊ शकतात. सर्वोच्च न्यायालयाने सरकारलाही काही थेट प्रश्न विचारले. वक्फ बाय युजर हे का हटविले गेले, महाअधिवक्ता तुषार मेहता यांना विचारण्यात आला.

### मालमत्तांची जमीन सरकारी आहे

१४ व्या किंवा १५ व्या शतकातील बहुसंख्या मशिदींबाबत काही पुरावा मिळणार नाही. त्यामुळे बहुसंख्या मशिदे वक्फ बाय युजर असेल. यावर महाअधिवक्त मेहता यांनी सांगितले की, अशा मालमत्तांची नोंदणी करण्यापासून कुणीही रोखले नाही. तसेच सरकारने जर अशा मालमत्तांची जमीन सरकारी आहे.

## अनुराग कश्यपला हंसल मेहतांनी केली होती मदत

कलाकार म्हटलं की, स्ट्रगल हा आलाच. आज काम आहे, तर उद्या नाही. कधी कामाचे चांगले पैसे मिळतात, तर कधी कमी पैशांत काम करावं लागतं. त्यामुळे अनेक कलाकारांचा संघर्ष असतो. सध्या पॉडकास्टच्या माध्यमातून अनेक कलाकार मंडळी त्यांच्या सुरुवातीच्या काळातील स्ट्रगलबद्दल बोलताना दिसत आहेत. बॉलीवूडमधील नामांकित दिग्दर्शक हंसल मेहता यांनीदेखील इंडस्ट्रीतील प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक अनुराग कश्यप यांचा संघर्षमय काळ सांगितला आहे. 'पिंकव्हिला'ला दिलेल्या मुलाखतीत हंसल मेहता यांनी अनुराग कश्यप यांच्याबद्दल बोलताना सांगितलं, "पूर्वी मनोज बाजपेयी महेश भट्ट यांच्या अंधेरीतील फ्लॅटमधील एका खोलीत राहायचा तेव्हा आम्ही अनेकदा भेटायचो. एक दिवस मनोजच्या घरी गेलो असताना तिथे एक व्यक्ति आली. दरवाजा ठोठावला आणि म्हणाला , सर... मी म्हटलं की, मनोज झोपला आहे. त्यावर तो म्हणाला, मला तुम्हालाच भेटायचं आहे. मी 'हायवे' चित्रपट पाहिला होता, तेव्हा वेडा झालो होतो. मी हायवे चित्रपटाचा मोठा फॅन आहे. तुम्हालाच कधीपासून शोधत आहे. मी म्हणालो की, तू काय करतोस? मी अभिनेता आहे आणि लिहितोसुद्धा, असं त्यानं सांगितल्यावर त्याला विचारलं की, तुला एक गोष्ट सांगतो. लिहिशील का? आणि त्यावेळी त्याला सहज घाईघाईत एक गोष्ट सांगितली. तो म्हणाला की, सर, मी लिहिन मला फक्त १५ हजार हवेत. घराचं तीन महिन्यांचं भाडं द्यायचं आहे. त्याला पैसे हवे होते म्हणून त्याने मला ४८ तासांत स्क्रीनप्ले लिहून दिला. मीही १५ हजारांऐवजी त्या दिवशी त्याला ७५ हजार दिले होते.

# रणदीपने मणिपूरमध्येच का केलं लग्न?

बॉलीवूड अभिनेता रणदीप हुडा आणि लिन लैश्राम यांनी दीड वर्षापूर्वी लग्न केलं. दोघांची हे आंतरजातीय लग्न होतं. रणदीप हरियाणाचा जाट असून लिन मणिपूरची आहे. या दोघांचे लग्न इंफाळमध्ये पारंपरिक मणिपुरी पद्धतीने झाले होते. रणदीप हुड्डाने नुकताच खुलासा केला की त्याचा कधीच लग्न करण्याचा विचार नव्हता, परंतु लिनला भेटल्यानंतर मत बदललं. "मला शाळेत खूप वाईट वाटायचं. मला वाटायचं की माझ्यासारखं मी ज्या प्रकारचं शिक्षण शाळेत घेतोय, तसं शिकायला मला दुसऱ्या जीवाला या जगात आणायला आवडणार नाही (हसत). त्यामुळे माझा लग्न करण्याचा हेतू नव्हताच, पण कसे तरी आम्ही एकमेकांना भेटलो आणि आम्ही लग्न केलं, याचा मला खूप आनंद झाला. मला लग्न करायला थोडा उशीर झाला कारण मला सरकारी नोकरी नाही असा विनोद मी करत असतो," असं रणदीप म्हणाला.शुभांकर मिश्राच्या पॉडकास्टमध्ये रणदीपने सांगितलं की त्याने लग्न ईशान्येत का केलं? "तो देखील आपल्या देशाचाच एक भाग आहे. प्रेमात पडताना जात, धर्म, देश किंवा वय याचा विचार केला जात नाही. आम्ही एकत्र आलो आणि तेच महत्त्वाचं होतं," रणदीप म्हणाला. या लग्नातही खूप अडथळे आले, असं त्याने नमूद केलं. बऱ्याच अडचणी आल्या. इतरांप्रमाणेच माझ्या आई-वडिलांचीही इच्छा होती की, मी जातीतच लग्न करावे. जाट जातीबाहेर लग्न करत नाही. जातीबाहेर लग्न करणारा मी माझ्या कुटुंबातील पहिला आहे.

## बिपाशा कमवते करोडो रुपये



आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि करणची गणना खूप श्रीमंत जोडप्यांमध्ये केली जाते. बिपाशाने चित्रपटांच्या दुनियेत खूप नाव कमावले आहे पण तुम्हाला माहिती आहे का या अभिनेत्रीची एकूण संपत्ती किती आहे? त्याच्या एकूण संपत्तीबद्दल जाणून घेऊया. बिपाशा बसू मुख्यतः तिच्या चित्रपट आणि जाहिरातींमधून मोठी कमाई करते. बिपाशा तिच्या प्रत्येक चित्रपटासाठी करोडो रुपये मानधन घेते. बिपाशा बसूची एकूण संपत्ती 15 मिलियन डॉलर म्हणजेच जवळपास 113 कोटी रुपये आहे. यासोबतच बिपाशा बसूचे मुंबई (वांद्रे) येथे 16 कोटी रुपयांचे आलिशान घर आहे, ज्यामध्ये ती तिच्या पतीसोबत आनंदी जीवन जगत आहे. जर तिच्या कार कलेक्शनबद्दल सांगायचं झालं तर, बिपाशाकडे ऑडी क्यू, 25 लाख किमतीच्या फोक्सवॅगन बीटल आणि 28 लाख किमतीच्या टोयोटा फॉर्च्युनर सारख्या आलिशान कार आहेत. आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि

## गायिका सोनू कक्करने भावंडांशी तोडले संबंध



गायिका सोनू कक्कर(SONU KAKKAR)ने नुकतीच सोशल मीडियावर धक्कादायक पोस्ट शेअर केली होती. सोनू कक्करने तिच्या भावंडांशी नाते तोडल्याचे तिच्या पोस्टमध्ये स्पष्ट केले होते. नेहा कक्कर व टोनी कक्करची ती बहीण आहे. या दोघांशी तिने संबंध तोडल्याचे तिच्या पोस्टमध्ये म्हटले होते. तिच्या या पोस्टमुळे अनेकांना धक्का बसला होता. आता कलाकारदेखील यावर वक्त होताना दिसत आहे. शिव ठाकरे(SHIV THAKARE)ने यावर वक्तव्य केले आहे. व्हायरल भयानीशी बोलताना शिव ठाकरे म्हणाला, "खरं सांगायचं तर मला खूप हसायला आलं. हे चांगले आणि गोड लोक आहेत. चांगले कलाकार आहेत. पण जेव्हा सिबलिंग डिव्होर्सची बातमी समजली तेव्हा वाटलं की, लोकांच्या घटस्फोटाच्या बातम्या ऐकायला येत होत्या ते काही कमी आहे का की आता हे सिबलिंग डिव्होर्ससुद्धा होत आहेत.

# अरबाज खानची दुसरी पत्नी प्रेग्नंट आहे?



बॉलीवूडमधील कलाकार अनेकविध कारणांमुळे सातत्याने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटांमुळे, तर कधी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळेदेखील मोठ्या चर्चेत असतात. आता अभिनेता अरबाज खान(ARBAAZ KHAN) हा त्याच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. बॉलीवूड अभिनेता अरबाज खान त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. वयाच्या ५७ वर्षी अरबाज खान पुन्हा बाबा होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. त्याची दुसरी पत्नी शूरा व अरबाज हे दोघेही एका दवाखान्याबाहेर एकत्र दिसल्याने शूरा गरोदर असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. सोशल मीडियावर हा व्हिडीओ व्हायरल होत असल्याचे दिसत आहे. अनेकांनी कमेंट्समध्ये शूराचा बेबी बंप दिसत असल्याचेही म्हटले आहे. मात्र, सत्य वेगळे असल्याचे म्हटले जात आहे. बॉलीवूड शादिजनुसार, शूरा व अरबाजने मॅटर्निटी क्लिनिकला भेट दिलेली नाही. अरबाज व शूरा हे डॉक्टर राकेश सिन्हा व मंजू सिन्हा यांच्या फायब्रॉइड दवाखान्यामध्ये गेले होते. हा दवाखाना स्त्रीरोग शस्त्रक्रिया, फायब्रॉइड व गर्भाशय काढण्यासाठी प्रसिद्ध आहे. या दोन्ही डॉक्टरांची त्यांच्या कामगिरीसाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्डमध्ये नोंद झाली आहे. त्यामुळे अरबाज व शूरा हे कशासाठी आले होते, हे स्पष्ट झाले नसले तरीही समोर आलेल्या माहितीनुसार शूरा प्रेग्नंट नसल्याचे म्हटले जात आहे.अरबाज व शूरा यांनी यावर कोणतेही अधिकृत वक्तव्य केलेले नाही. त्यामुळे शूरा व अरबाज आई-वडील होणार असल्याच्या चर्चा अफवा आहेत, असे म्हटले जात आहे. याआधी शूरा व अरबाजने कुटुंबाबरोबर ईद सेलिब्रेशन केल्याचे पाहायला मिळाले. त्यावेळी त्यांनी पापाराझींसाठी पोज न दिल्याने त्यांची मोठी चर्चा झाली होती.दरम्यान, अरबाजचे शूराबरोबरचे हे दुसरे लग्न आहे. त्याने याआधी मलायका अरोराबरोबर लग्नगाठ बांधली होती. १२ डिसेंबर १९९८ ला त्यांनी लग्नगाठ बांधली होती आणि २०१७ ला घटस्फोट झाला. त्यांना एक मुलगा आहे. अरबाज खानने २०२३ मध्ये शूराबरोबर लग्नगाठ बांधली. अनेकदा हे जोडपे कार्यक्रमांसाठी एकत्र हजेरी लावताना दिसते. आता अरबाज व शूरा या सगळ्या प्रकरणावर काय प्रतिक्रिया देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. बॉलीवूडमधील कलाकार अनेकविध कारणांमुळे सातत्याने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटांमुळे, तर कधी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळेदेखील मोठ्या चर्चेत असतात. आता अभिनेता अरबाज खान(ARBAAZ KHAN) हा त्याच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आला आहे.बॉलीवूड अभिनेता अरबाज खान त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. वयाच्या ५७ वर्षी अरबाज खान पुन्हा बाबा होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

# सुपर ओव्हर थरारात दिल्लीची सरशी!

## वेगवान गोलंदाज स्टार्क दिल्लीच्या विजयाचा शिल्पकार ठरला

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**हंगामातल्या पहिल्यावहिल्या सुपर ओव्हरमध्ये दिल्लीने घरच्या मैदानावर राजस्थानवर विजय मिळवला. अनुभवी वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क दिल्लीच्या विजयाचा शिल्पकार ठरला. मिचेल स्टार्कने सुपर ओव्हरमध्ये राजस्थानच्या फलंदाजांना अकरा धावाच करू दिल्या. राहुल आणि ट्रिस्टन स्टब्ज यांनी दिल्लीला शानदार विजय मिळवून दिला.**

१२ धावांचा पाठलाग करताना राहुलने पहिल्या चेंडूवर दोन धावा काढल्या. थ्रो अचूक असता तर राहुल रनआऊट झाला असता. दुसऱ्या चेंडूवर राहुलने चौकार खेचला. तिसऱ्या चेंडूवर राहुलने एक धाव मिळवली. चौथ्या चेंडूवर ट्रिस्टन स्टब्जने षटकार खेचत दिल्लीच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.मिचेल स्टार्कने टाकलेल्या षटकात शिमोरन हेटमायरला धाव काढता आली नाही. दुसऱ्या चेंडूवर त्याने चौकार लगावला. तिसऱ्या चेंडूवर त्याने एक धाव काढली. चौथ्या चेंडूवर ध्रुव जुरेलने चौकार लगावला. पंचांनी नोबॉलचा कौल दिला. अशा रीतीने एका चेंडूवर पाच धावा निघाल्या. पुढच्या चेंडूवर रियान पराग रनआऊट झाला. पाचव्या चेंडूवर चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात यशस्वी जैस्वाल रनआऊट झाला आणि राजस्थानचा डाव आटोपला. राजस्थानने ११ धावा केल्या. आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना संजू सॅमसन आणि यशस्वी जैस्वाल यांनी ३४ चेंडूत ६१ धावांची खणखणीत सलामी दिली. विपराज निगमच्या षटकात चौकार, षटकार खेचल्यानंतर संजूला दुखापतीचा त्रास जाणवला. एक चेंडू खेळून संजू रिटायर हर्ट झाला. रियान परागला अक्षर पटेलने त्रिफळाचीत केलं. ३७ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह ५१ धावांची खेळी करून यशस्वी जैस्वाल बाद झाला. यशस्वी बाद झाल्यानंतर नितीश राणाने सामन्याची सूत्रं हाती घेतली. सातत्याने चौकार, षटकारांची लूट करत नितीनने धावगतीचं आव्हान नियंत्रणात ठेवलं. नितीशला बाद करत स्टार्कने



राजस्थानला धक्का दिला. मोहित शर्माने टाकलेल्या १९व्या षटकात राजस्थानने १४ धावा काढल्या. शेवटच्या षटकात राजस्थानला ९ धावांची आवश्यकता होती. मात्र मिचेल स्टार्कच्या घोटीव गोलंदाजीसमोर शिमोरन हेटमायर आणि ध्रुव जुरेल जोडीला चौकार किंवा षटकार मारता आला नाही. शेवटच्या चेंडूवर राजस्थानला दोन धावांची आवश्यकता होती. मात्र दुसरी धाव घेण्याच्या प्रयत्नात ध्रुव जुरेल रनआऊट झाला आणि सामना सुपर ओव्हरमध्ये जाणार हे स्पष्ट झालं.राजस्थानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. जेक फ्रेझर मॅकगर्क या लढतीतही आततायी फटका खेळून बाद झाला. त्याच्या जागी करुण नायर फलंदाजीला आला. मुंबई इंडियन्सविरुद्ध करुणने झंझावाती खेळी केली होती. सात वर्षांनंतर करुणने आयपीएल स्पर्धेत अर्धशतक पूर्ण केलं. चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात करुण भोपळाही न फोडता बाद झाला. यानंतर अभिषेक पोरेल आणि के.एल.राहुल यांनी डाव सावरला. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ६३ धावांची भागीदारी केली. जोफ्रा आर्चरने राहुलला बाद करत ही जोडी फोडली. त्याने ३२ चेंडूत ३८ धावांची खेळी केली. थोड्याच वेळात अभिषेक पोरेलही तंबूत परतला. वानिंदू हासारंगाने त्याला बाद केलं. त्याचं अर्धशतक एका धावेने हुकलं. कर्णधार अक्षर पटेल याने ट्रिस्टन स्टब्जला साथीला घेत

### संजू रिटायर हर्ट झाला

अशा रीतीने एका चेंडूवर पाच धावा निघाल्या. पुढच्या चेंडूवर रियान पराग रनआऊट झाला. पाचव्या चेंडूवर चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात यशस्वी जैस्वाल रनआऊट झाला आणि राजस्थानचा डाव आटोपला. राजस्थानने ११ धावा केल्या.आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना संजू सॅमसन आणि यशस्वी जैस्वाल यांनी ३४ चेंडूत ६१ धावांची खणखणीत सलामी दिली. विपराज निगमच्या षटकात चौकार, षटकार खेचल्यानंतर संजूला दुखापतीचा त्रास जाणवला. एक चेंडू खेळून संजू रिटायर हर्ट झाला. रियान परागला अक्षर पटेलने त्रिफळाचीत केलं. ३७ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह ५१ धावांची खेळी करून यशस्वी जैस्वाल बाद झाला. यशस्वी बाद झाल्यानंतर नितीश राणाने सामन्याची सूत्रं हाती घेतली. सातत्याने चौकार, षटकारांची लूट करत नितीनने धावगतीचं आव्हान नियंत्रणात ठेवलं. नितीशला बाद करत स्टार्कने राजस्थानला धक्का दिला.

पाचव्या विकेटसाठी १९ चेंडूत ४१ धावांची भागीदारी केली. अक्षर ... करुन बाद झाला. यानंतर स्टब्जला आशुतोष शर्माची साथ मिळाली. या जोडीने सहाव्या विकेटसाठी १९ चेंडूत ४२ धावांची भागीदारी केली. या दोन भागीदाऱ्यांच्या बळावर दिल्लीने राजस्थानसमोर १८९ धावांचं लक्ष्य ठेवलं.१२ धावांचा पाठलाग करताना राहुलने पहिल्या चेंडूवर दोन धावा काढल्या. थ्रो अचूक असता तर राहुल रनआऊट झाला असता. दुसऱ्या चेंडूवर राहुलने चौकार खेचला. तिसऱ्या चेंडूवर राहुलने एक धाव मिळवली. चौथ्या चेंडूवर ट्रिस्टन स्टब्जने षटकार खेचत दिल्लीच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.मिचेल स्टार्कने टाकलेल्या षटकात शिमोरन हेटमायरला धाव काढता आली नाही. दुसऱ्या चेंडूवर त्याने चौकार लगावला. तिसऱ्या चेंडूवर त्याने एक धाव काढली. चौथ्या चेंडूवर ध्रुव जुरेलने चौकार लगावला. पंचांनी नोबॉलचा कौल दिला.

# एका पत्रामुळे राक्षेवरील निलंबन कायम!

## शिवराज राक्षेवर कुस्तीगीर परिषदेने तीन वर्षे निलंबनाची कारवाई केली

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**यंदाच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील पृथ्वीराज मोहोळ विरुद्ध शिवराज राक्षे (उपांत्य सामना) यांच्यातील कुस्तीचा निकाल वादग्रस्त ठरला होता. याप्रकरणी मल्ल शिवराज राक्षेवर कुस्तीगीर परिषदेने तीन वर्षे निलंबनाची कारवाई केली होती. दरम्यान, दोघांमधील कुस्तीच्या निकालाप्रकरणी कुस्तीगीर परिषदेने नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल समोर आला असून पंचांनी चुकीचा निर्णय दिल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे कुस्तीगीर परिषदेने पंच नितेश काबिले यांच्यावर तीन वर्षांची बंदी घातली आहे.**




अहिल्यानगरमध्ये २ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र केसरी स्पर्धेची उपांत्य व अंतिम फेरी पार पडली होती. पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहोळ याने ही स्पर्धा जिंकत यंदाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा मानकरी ठरला. पैलवान पृथ्वीराज मोहोळने स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पैलवान महेंद्र गायकवाडवर मात करत महाराष्ट्र केसरी स्पर्धेची गदा पटकावली. मात्र, या स्पर्धेच्या उपांत्य व अंतिम फेरीत काही खेळाडूंचा पंचांबरोबर वाद झाला होता.पंचांशी वाद घातल्यामुळे कुस्तीगीर परिषदेने महेंद्र गायकवाडवर तीन वर्षांसाठी निलंबनाची कारवाई केली होती. तर, उपांत्य फेरीत मोहोळ विरुद्ध पैलवान शिवराज राक्षे आमने-सामने होते. या सामन्यात ४० सेकंदात पंचांनी पृथ्वीराज मोहोळला विजयी घोषित केलं होतं. पंचांनी चुकीच्या पद्धतीने निकाल दिल्याचा आरोप करत शिवराज

### कारवाई मागे घेण्यात पत्राचा अडथळा

भोंडवे म्हणाले, “महाराष्ट्रातील कुस्तीच्या इतिहासातील ही पहिलीच कारवाई आहे. पण एकदा निकाल दिल्यानंतर तो बदलता येत नाही. यामध्ये पृथ्वीराज मोहोळची काही चूक नाही. पण पंचांनी काय निर्णय द्यावा, हा त्यांचा निर्णय असतो. महेंद्र गायकवाड यांनी निलंबन कारवाई मागे घेण्यासाठी पत्र दिले होते.

राक्षे याने पंचांशी वाद घातला. तसेच त्याने एका पंचाला लाथही घातली होती. त्यामुळे कुस्तीगीर परिषदेने शिवराज राक्षेला देखील तीन वर्षांसाठी निलंबित केलं होतं. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे म्हणाले, “२ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र केसरी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे अशी कुस्ती झाली होती. या सामन्यात पंचाच्या निर्णयाने वाद निर्माण झाला होता. त्यानंतर १५ दिवस समाजमाध्यमांवर मोठा गोंधळ उडाला. आम्ही हा सर्व प्रकार पाहून विलास कथुरे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. या कुस्ती सामन्याची चौकशी करण्याचे आदेश त्यांना दिले होते.२८ फेब्रुवारीला या समितीचा अहवाल मिळाला. त्यानंतर गेल्या आठवड्यात कुस्तीगीर संघाची ऑनलाईन बैठक झाली.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज

ePaper
। गुरुवार ।
। दि. 17 एप्रिल 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




ADMISSION OPEN
From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation
Batch
“यत् भावो – तत् भवति”
Our Courses
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> ‘C’ Language
> ‘C ++’ Language
> Basic Java
> Basic Tally
> M. S. Office
Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
2025-26
ADMISSIONS
OPEN
PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION
50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS
Contact Us Now
86687 55826
98232 31705
Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105

# प्रा. अस्मिता यादव यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## शिक्षण विश्व : कोल्हापूरच्या नामांकित आनंदगंगा फाउंडेशनचा कार्यक्रम

। पिंपरी-चिंचवड: । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कोल्हापूरच्या नामांकित आनंदगंगा फाउंडेशन च्या वतीने २०२५ चा पुरस्कार वितरण सोहळा आदर्श गुरुकुल अँकॅडमी कोल्हापूर येथे संपन्न झाला. आनंदगंगा फाउंडेशन कोल्हापूर यांचे वतीने दरवर्षी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कला व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला राज्यस्तरीय पुरस्कार दिला जातो.**



यावर्षी चिंचवड येथील कमला शिक्षण संकूल संचालित प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रा. अस्मिता बिनय यादव यांच्या शैक्षणिक ,सांस्कृतिक, संशोधनकार्य ,सामाजिक क्षेत्रातील मोलाची केलेली अतूलनीय कामगिरी व कार्य पाहून त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार समारंभपूर्वक यथोचित सन्मान प्रदान करण्यात आला .

महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा व गोवा याच्या राज्यातून सुमारे 250 प्रस्ताव आनंदगंगा फाउंडेशन पुरस्कार निवड समितीकडे आले होते. त्यातूनच नारीशक्ती व आदर्श शिक्षक पुरस्कार समारंभ पूर्वक प्रदान करण्यात आले.

सदर पुरस्कार समारंभ कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कोल्हापूरचे माजी शिक्षण सभापती अर्थ व शिक्षण समिती कोल्हापूरचे प्रवीण यादव समवेत प्रमुख अतिथी विजयसिंह माने ( अध्यक्ष, अशोकराव माने शिक्षण संकुल ) तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्याता माननीय डॉ. साधना पाटील ( संचालिका, यशवंत व्यसनमुक्ती केंद्र शिराळा ) , आदर्श गुरुकुल संस्थांचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रेय घुगरे, आदर्श गुरुकुल संस्थांच्या प्राचार्या डॉ. महानंदा घुगरे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते आनंदगंगा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. तानाजी पवार यांनी सर्व उपस्थित पुरस्कार प्राप्त शिक्षक व त्याच्या कुटुंबीयांचे आभार मानले .व त्याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कमला शिक्षण संकुलंचे संस्थापक सचिव डॉ.दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम समवेत सर्व प्राध्यापक वृंन्द व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यानी प्रा. आस्मिता यादव यांचे कौतुक करून त्याच्या भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more